**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक २४ जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **सर्वांना सोबत घेऊन आणि संविधानाचे पावित्र्य राखून आपल्या सरकारला निर्णय घ्यायचे असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन - १८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाला आजपासून सुरुवात.**
- **केंद्र सरकारनं सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये गव्हाच्या साठ्यावर 31 मार्च 2025 पर्यंत मर्यादा केली लागू.**
- **वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट- यूजी परीक्षा पेपरफुटीप्रकरणी कारवाईला वेग.**
- **भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीच्या काठावरील जलपर्यटन प्रकल्पाचे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन-547 कोटींच्या विकास कामांचं केलं भूमिपूजन.**

*****

मोदी संबोधन

विकसित भारत घडवण्याच्या संकल्पाने १८ व्या लोकसभेच पहिलं अधिवेशन सुरू होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आपलं सरकार देशसेवेसाठी आणि जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी म्हटलं. अधिवेशनापूर्वी संसदेच्या आवारात त्यांनी पत्रकारांना संबोधित केलं. आपल्या सरकारला सर्वांना सोबत घेऊन आणि संविधानाचे पावित्र्य राखून लवकर निर्णय घ्यायचे असल्याचं त्यांनी सांगितलं. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच लोकसभेच्या खासदारांचा शपथविधी सोहळा नवीन संसद भवनात होत असल्याचं ते म्हणाले. लोकशाहीची प्रतिष्ठा राखण्यासाठी विरोधकांकडून योग्य वर्तनाची अपेक्षा असल्याचंही ते म्हणाले. येत्या बुधवारी २६ जूनला नवीन लोकसभा सभापतींची निवड होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन २७ जूनला सुरु होणार असून त्याच दिवशी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण होईल.

लोकसभा अधिवेशन

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आजपासून सुरू झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात भर्तृहरी महताब यांना हंगामी सभापती म्हणून शपथ दिली. भर्तृहरी महताब यांनी संसदेच्या नवनिर्वाचित खासदारांना सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ दिली. सर्वप्रथम वाराणसीचे खासदार नरेंद्र मोदी यांना शपथ दिली गेली. सभापती निवडीपर्यंत लोकसभेचे कामकाज चालविण्यात मदत करण्यासाठी नियुक्त केलेल्या अध्यक्षांच्या तालिकेला शपथ देण्यात आली. भाजप खासदार राधामोहन सिंग आणि फग्गन सिंग कुलस्ते यांनी तालिका सदस्य म्हणून शपथ घेतली.

इंडिया आघाडी घोषणाबाजी

इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज लोकसभेत संविधानाची प्रत घेऊन प्रवेश केला. काँग्रेस, नेते मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, द्रमुकचे टी आर बालू यांच्यासह अनेक सदस्यांनी घोषणाबाजी केली. समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव यांच्यासह इतर खासदारही संविधानाची प्रत घेऊन सभागृहात आले होते. नीट परीक्षेतली कथित अनियमितता, पश्चिम बंगालमधला रेल्वे अपघात या मुद्यांवरून काँग्रेसने सरकारवर टीका केली आहे. या मुद्द्यांवर सरकार गप्प का? असा सवाल काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

गव्हाची मर्यादा

गव्हाचे दर स्थिर राखण्याच्या दृष्टीनं साठेबाजी रोखण्याकरता केंद्र सरकारनं गव्हाच्या साठवणुकीवर मर्यादा घातल्या आहेत. केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण सचिव संजीव चोप्रा यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. त्यानुसार व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी ही मर्यादा ३ हजार टन, किरकोळ विक्रेत्यांसाठी १० टन, तर मोठ्या साखळी समूहांच्या प्रत्येक दुकानाकरता १० टन आणि त्यांच्या आगारांकरता ३ हजार टन इतकी आहे. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या सर्व व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, साखळी समूह आणि प्रक्रियाकर्त्यांना ही मर्यादा लागू आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत ती लागू राहील, असं चोप्रा यांनी सांगितलं. गव्हाचे दर स्थिर रहावेत यासाठी सरकार गरजेनुसार या साठा मर्यादेचा आढावा घेईल, असं ते म्हणाले. गव्हाचा तुटवडा असल्याचं वृत्त त्यांनी फेटाळलं. संबंधित कायदेशीर संस्थांना, गहू साठ्याची स्थिती घोषित करावी लागेल तसेच अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या पोर्टलवर नियमितपणे त्यांना साठ्याची माहिती अद्ययावत करावी लागेल आणि जर त्यांच्याकडे असलेला साठा विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर त्यांनी ही

अधिसूचना जारी केल्यापासून 30 दिवसांच्या आत विहित साठा मर्यादेपर्यंत आणणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजना

महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांना सौर ऊर्जा निर्मितीद्वारे मोफत वीज मिळावी यासाठी केंद्र सरकारतर्फे प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजना फेब्रुवारी महिन्यात सुरू करण्यात आली आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात नोंदणी झाल्यानंतर गेल्या काही दिवसात योजनेच्या वेबसाईटबाबत ग्राहकांकडून काही तक्रारी येत आहेत. या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयातर्फे तज्ञांची तुकडी येत्या रविवारी काम सुरू करत आहे.यासाठी दूरदृष्यं प्रणालीद्वारे बैठक झाली, यात नागपूरचे प्रतिनिधीही सहभागी झाले होते. दरम्यान, या प्रकरणी ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनच्या सभासदांकडून आजपासून २८ जूनपर्यंत संविधान चौकात उपोषण सुरु केलं गेलं आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेमधील इंटिग्रेटर्सना गेल्या तीन महिन्यांपासून या पोर्टल संदर्भात अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्याचा जलद निपटारा करावा अशी असोसिएशनकडून मागणी करण्यात आली आहे.

इन्कम टॅक्स

पुण्याचे कर-सवलत विभागाचे आयकर आयुक्त अभिनय कुंभार आणि नागपूरचे आयकर सहआयुक्त डॉ. भूषण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एक्झम्पशन रेंज, प्राप्तिकर विभागा तर्फे संपर्क कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. येत्या 26 जून रोजी दुपारी 4.00 ते 5.30 पर्यंत चाणक्य सभागृह, आयकर भवन सिव्हिल लाईन्स, सेमिनरी हिल्स, नागपूर इथं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. धर्मादाय संस्थेशी संबंधित आयकर कायद्यातील सवलत विषयक तरतुदी आणि नोंदणीसाठी मूलभूत आवश्यकता तसंच धर्मादाय संस्थांच्या नोंदणी प्रक्रियेतील अलीकडील बदल हा या कार्यक्रमाचा मुख्य विषय आहे. सनदी लेखापाल प्रणव अष्टेकर या आउटरीच कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते असतील. सर्व विश्वस्त,कर्मचारी, प्राप्तिकर अभ्यासक आणि चार्टर्ड अकाउंटंट यांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

नीट युजी

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षा पेपरफुटीप्रकरणी कारवाईला वेग आला आहे. केंद्रीय अन्वेषण संस्थेकडे हा तपास सोपवण्यात आला असून, सीबीआयने याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. नीट-यूजी पेपरफुटी आणि गैरव्यवहार प्रकरणी विविध यंत्रणांनी विविध

राज्यांतून अनेक संशयितांना ताब्यात घेतलं आहे. त्यांची चौकशी सुरु आहे. या प्रकरणाची पुढची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात ८ जुलै रोजी होणार आहे. अतिरिक्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा काल झाली. एकंदर ८१३ विद्यार्थ्यांनी ही फेरपरीक्षा दिल्याची, तर साडेसातशे विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं दिली आहे. दरम्यान, विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर कालची नीट-पदव्युत्तर परीक्षा पुढे ढकलण्यात आली. परीक्षेचं पावित्र्य अबाधित राखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे तसंच या प्रकरणात दोषी असणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाईल, असं शिक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. दरम्यान, नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचल्याचं उघड झालं आहे. नांदेडच्या विशेष तपास पथकानं संजय जाधव आणि जलील उमरखाँ पठाण या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना अटक केली. तसेच इरन्ना कोनगलवार आणि दिल्लीतील गंगाधर नावाचा इसम अशा चौघांवर लातूरच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या नेतृत्वाखाली स्थापित विशेष पथकाद्वारे पुढील तपास केला जात आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीच्या काठावर १०२ कोटी रुपये खर्च करून नव्याने सुरू करण्यात आलेल्या जलपर्यटन प्रकल्पाचं उद्घाटन केलं तसंच 547 कोटींच्या विकास कामांचं भूमिपूजन देखील केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वतः बोट चालवून जलपर्यटनाचा अनुभवही घेतला. या जलप्रकल्पामुळे भंडारा जिल्हा हा पर्यटनाचा जिल्हा म्हणून देशाच्या नकाशावर येईल. जलपर्यटनातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. या प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी परिसरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वृक्षारोपणही केलं. याप्रसंगी आमदार नरेंद्र भोंडेकर, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकरांची उपस्थिती होती.

संक्षिप्त पुनररिरीक्षक कार्यक्रम

आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहु नये या करीता भारत निवडणूक आयोगाकडून मतदार यादीचा संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषीत करण्यात आलेला आहे. सदर संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी 25 जून ते २४ जुलै या कालावधीत घरोघरी भेटी देऊन मतदार यादीची तपासणी करणार असून जे मतदार 18 वर्षाचे

झालेले आहे अशा पात्र मतदारांचे नमुना क्र.6 भरुन घेतील. मतदार यादीत मृत मतदार, दुबार मतदार व जे मतदार त्यांच्या पत्त्यावर आढळत नाही अशा मतदारांचे नाव मतदार यादीतून कमी करुन मतदार यादीतील त्रुटया दुर करतील. मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबतचा अर्ज Online पद्धतीने Voter Helpline App वर देखील उपलब्ध असणार आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयात मतदार यादी संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम-२०२४ बाबत माहिती देण्यासाठीची पत्रकार परिषद पार पडली.

पाणी पुरवठा सूचना

नागपूर महानगरपालिकेतर्फे येत्या 26 जून रोजी अर्थात परवा सकाळी 11वाजता ते 27 जूनला सकाळी 11 वाजेपर्यंत एक हजार मिलिमीटर व्यासाच्या पांडे लेआउट फिडरवर शट डाऊन घेण्यात येणार आहे. यात 700 मिलिमीटर व्यासाच्या वॉल बदलाच्या कामाचा समावेश आहे. हे काम गांधीनगर टी पॉईंट वर करण्यात येणार आहे. या कामामुळे गायत्री नगर, प्रताप नगर, खामला, टाकळी सिम, जयताळा, त्रिमूर्ती नगर, रामनगर आणि चिंचभवन या भागांमध्ये पाणीपुरवठा खंडित होणार असल्याने आगाऊ साठवणुकीची व्यवस्था करावी, असं आवाहन नागपूर महानगरपालिका आणि ऑरेंज सिटी वॉटर वर्क तर्फे करण्यात आलं आहे.

हवामान

विदर्भात येत्या 28 तारखेपर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यासाठी सतर्कतेचा यलो अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे. दरम्यान आज अमरावती, अकोला, बुलढाणा आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपुरात सकाळपासून ढगाळ वातावरण असून उकाडा मात्र कायम आहे. नागपूरात गेल्या 24 तासात 33 पूर्णांक 7 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भातील सर्व जिल्ह्यात कमाल तापमान 30 ते 35 अंश सेल्सिअस पर्यंत नोंदवण्यात आलं आहे. आगामी काही तासात विदर्भाच्या अनेक वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानेनं वर्तवली आहे.

*****